DISTRICT COURT
NAGPUR

DISTRICT COURT
NAGPUR



**उलटतपास आरोपीतर्फ अॅड. श्री एन.पी. बागडे यांचेमार्फत शपथेवर पुढे सुरू**

मी रू ६०,०००/- माझी जाउ नंदाच्या समक्ष आरोपीला दिले. सदर रक्कम रू ६०,०००/- माझे वडिलांनी दिले. माझ वडिलांकडे शेती आहे. सदर रू ६०,०००/- रक्कम माझे वडिलांनी दिवाळीच्या वेळेस मला दिली होती. आरोपीला रू ६०,०००/- दिल्याबाबत कोणतीही लिखपढी केली नव्हती. आरोपीने मला तो सेवानिवृत्त झााल्यावर रक्क्म परत करेल असे सांगितल्यामुळे मी लिखापढी केली नाही. हे म्हणणे खरे

नाही की मी आरोपीला रू ६०,०००/- रक्कम दिली नाही म्हणुन त्याबाबत लिखापढी केली नाही.

मी रू ४०,०००/- रक्कम माझी जाउ नंदासमक्ष आरोपीला दिले. सदर रक्कम कोणत्या तारखेला दिली हे मला सांगता येत नाही. साक्षदार सांगते की नवव्या महिन्यात दिली. सदर रक्कम माझे वडिलांनी मला एक लाख रूपये दिले होते त्यातलीच होती. सदर रू ४०,०००/- रक्कम आरोपीला दिल्याबाबत लिखापढी केली नव्हती कारण आरोपीने सदर रक्कम मला देईल असे कबुल केले होते. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीला रक्कम ४०,०००/- दिलीच नाही म्हणुन तशी लिखापढी केली नाही. रू ६०,०००/- रक्कम मी आरोपीला कोणत्या तारखेला दिली हे मला आठवत नाही. साक्षीदार सांगते की दहाव्या महिन्यात दिले. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीला रू ६०,०००/- रक्कम दिली नाही म्हणुन तशी लिखापढी केली नाही.

मी मीनाचे पती वामन सोनेकर यांना ओळखते. मी वामन सोनेकरचे मित्र अरूण सीताराम चव्हाण यांना ओळखत नाही. अरूण सीताराम चव्हाण कडुन आरोपीने काही रक्कम उधार घेतली होती याबाबत मला माहिती नाही. हे मला माहित नाही की आरोपीने अरूण चव्हाण कडुन दिड लाख रूपये रक्कम उसनी घेतली होती व हमी म्हणुन श्री चव्हाणला कोरा चेक दिला होता. हे मला माहित नाही की आरोपीने श्री चव्हाणला दीड लाख रूपये परत केले. हे म्हणणे खरे आहे की वामन सोनेकर व अरूण चव्हाण हे वन विभागात एकाच ठिकाणी नौकरी करतात. हे मला माहित नाही की त्यांचे एकमेकांच्या घरी जाणे येणे आहे. हे म्हणणे खरे नाही की वामन सोनेकर व चव्हाण यांनी दोघांनी मिळुन आरोपीची फसवणुक केली. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने माझे नावे कोणत्याही प्रकारचा चेक दिला नाही. हे म्हणणे

DISTRICT COURT NAGPUR

खरे नाही की आरोपी मला ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपीचे व माझे कौटुंबिक चांगले संबंध नाहीत. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीला रू १,६०,०००/- दिले नाही व आरोपीने मला कोणताही चेक दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की मीनाबाई सोनेकर यांच्या सांगण्यावरून मी आरोपीविरूध्द खोटी दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे शपथपत्र दाखल केले आहे व आज खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी सांगते त्याप्रमाणे कोणतीही घटना झाली नाही.

**उलटतपास पुर्ण**
**फेरतपास नाही**

श्रवणोत्तर स्वीकृती

(म. सु. बनचरे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,रामटेक
दिनांक ०१.०२.२०१९

समक्ष

(म. सु. बनचरे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,रामटेक
दिनांक ०१.०२.२०१९

DISTRICT COURT NAGPUR